# शुध्दीपत्रक

विधी अधिकारी, गट-अ, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय (जाहिरात क्र. **३१/२०१८**).

आयोगाकडून दि. २९ जून, २०१८ रोजी विधी अधिकारी, गट-अ, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय (जाहिरात क्र. ३१/२०१८) या पदावरील एका जागेच्या भरतीकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीतील परिच्छेद ३ मध्ये वेतनश्रेणीची पे बॅण्ड रु. **१५६००-३९१००/-**, ग्रेड पे **५४००** अशी तरतूद विहित केली आहे. परंतु, शासनाने दि. २४ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या पत्रान्वये वेतनश्रेणीबाबत पुढील बाब कळविली आहे.

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि. ०४ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये उच्च न्यायालयातील रिट याचिका क्रमांक ८४७४/२०१० मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून विषयाधीन पदास "रु. **१५६००-३९१००/-**, ग्रेड पे **५४००**" ही वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. अन्यथा, सदर पदास "रु. **९३००-३४८००/-**, ग्रेड पे **४६००**" ही वेतनश्रेणी लागू आहे. सदर शासन निर्णयातील अटीनुसार, रिट याचिका क्रमांक ८४७४/२०१० मध्ये उच्च न्यायालयाचा निर्णय राज्य शासनाच्या बाजूने लागल्यास सदर पदावरील अधिकाऱ्याकडून अतिप्रदान झालेली रक्कम वसूल करणे आवश्यक असल्याने, संबंधित उमेदवाराकडून त्या आशयाचे क्षतिपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond) भरुन घेणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णय क्र. औसुवआ-०२१३/प्र.क्र.२०/काम-६, दि. ०४ ऑक्टोबर, २०१३ शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रस्तुत पदासाठी शिफारसपात्र ठरलेल्या व नियुक्ती स्वीकारणाऱ्या उमेदवारास नियुक्तीच्या वेळी क्षतिपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond) भरुन देणे बंधनकारक असेल याची संबंधित उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ३० ऑक्टोबर, २०१८**

**अवर सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**